## लसीकरण सत्रापूर्वी

- समाजातील व्यक्तीच्या सहकार्याने सत्राच्या ठिकाणी सजावट करा
- जे कुटुंब लसीकरण करण्यास संकोचतात त्यांच्याशी संपर्क साधा, कारण जाणून घ्या आणि त्यांना जागरुक करा
- पंचायत आणि प्रतिष्ठित व्यक्तींच्या मदतीने मायकिंग, धार्मिक स्थळांवरुन घोषणा, मुलांची रॅली इत्यादी कार्यक्रम आयोजित करा.

## लसीकरण सत्राचा दिवस

- सर्व लाभार्थ्यांना सत्राच्या ठिकाणी बोलावून घ्या
- आलेल्या लाभार्थ्यांना लसीकरण सेवा मिळविण्यात मदत करा, त्यांना लसीकरणानंतर मुलाची काळजी कशी घ्यावी याविषयी सांगा पुढील सत्राला येण्याबाबत त्यांना अवगत करा.
- लसीकरण सत्र सुरु होऊन दोन तास उलटूनही सत्रासाठी न आलेल्या लाभार्थ्यांच्या घरी भेट द्या आणि त्यांना लसीकरण सत्रामध्ये घेऊन या

## लसीकरण सत्रानंतर

- मुलांना घातक आजारांपासून वाचवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलल्याबद्दल पालकांचे अभिनंदन करा
- लसीकरणानंतर मुलाला ताप किंवा सूज आल्यास, आरोग्य सेवेकीच्या सल्ल्यानुसार मुलाची काळजी घेण्यास सांगा. तापासाठी, पॅरासिटामॉल सिरप द्या
- त्यांना पुढील लसीकरणा वेळी द्यायच्या लसीचे नाव आणि तारीख याविषयी सांगा

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार

USAID FROM THE AMERICAN PEOPLE

MOMENTUM

YRG CARE



# 'आशा' कार्यकर्तींचे सर्वात महत्त्वाचे कार्य, पाच वर्षापर्यंतच्या प्रत्येक मुलाचे लसीकरण पूर्ण करणे




सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

**मिशन इंद्रधनुष्य ५.०** हा नियमित लसीकरणापासून वंचित राहिलेल्या मुलांना राहिलेल्या सर्व लसी देणे आणि आणि गोवर-रुबेला सारख्या आजारांपासून देश मुक्त करण्याचा एक मोठा प्रयत्न आहे. या मोहिमेत काही लसी राहिलेल्या गरोदर महिला आणि पाच वर्षापर्यंतच्या बालकांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी आपल्या परिसरात विशेष लसीकरण सत्र आयोजित केले जाईल. तुमच्या मुलाचे डिजिटल एमसीपी कार्ड तयार केले जाईल.

**७-१२ ऑगस्ट** | **११-१६ सप्टेंबर** | **९-१४ ऑक्टोबर**

**२०२३**





## सर्वेक्षण पूर्ण करा आणि देय लाभार्थ्यांची यादी (ड्यू लिस्ट) तयार करा

तुमच्या परिसरातील सर्व गरोदर महिला आणि पाच वर्षापर्यंतच्या मुलांचे संपूर्ण सर्वेक्षण करा. ज्यांचे लसीकरण चुकले आहे अश्या लाभार्थ्यांची देय यादी तयार करा

देय लाभार्थी यादी आरोग्य सेविका आणि अंगणवाडी सेविकांसोबत शेअर करा आणि कोणतीही चुकीची नोंद सापडली तर त्याची पडताळणी करा

## प्रचार आणि प्रसार करा

१. लसीकरणाबाबत संकोच असलेल्या तसेच शंका असलेल्या कुटुंबांना लसीकरणाचे महत्त्व पटवून द्या, त्यांना मिशन इंद्रधनुष्य ५.० अंतर्गत विशेष लसीकरण सत्रांबद्दल देखील माहिती द्या.

२. जे कुटुंब लसीकरण करण्यासाठी संकोच करत आहे अशा कुटुंबांचे मन परीवर्तन करण्यासाठी महिला गटातील सदस्य, धार्मिक गुरु आणि स्थानिक प्रतिष्ठित लोकांची मदत घ्या. तरीही ते लसीकरण करण्यास तयार नसतील, तर आरोग्य सेविका आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांना कळवा.

३. पंचायत सदस्यांच्या सहकार्याने, पुरुषांना लसीकरणाच्या महत्त्वाबद्दल जागरुक करण्यासाठी विशेष पुरुष गट बैठका आयोजित करा